MHBI160003102013

**नियमीत दिवाणी दावा क्र.९२/२०१३**
**मधील निशाणी ५ वरील आदेश**
( सोमीनाथ व इतर वि. कलाबाई व इतर )

**नियमीत दिवाणी दावा क्र.९२/२०१३ मधील निशाणी ५ वरील आदेश**
(सोमीनाथ व इतर वि. कलाबाई व इतर )

वादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी क्र.१ विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम होवून मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रस्तुतचे अर्ज दाखल केला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः**

२. मौजे खालापुरी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथील असुन गट क्र.५३५ क्षेत्र ०० हेक्टर ५९ आर व गट क्र.३११ मधील एक जलमय विहीर या मिळकती प्रस्तुत अर्जाचा वाद विषय असून यापुढे सदर मिळकतीस दावा मिळकती असे संबोधले आहे.

**वादींचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः**

३. वादींचे असे थोडक्यात कथन आहे की, वादी क्र.२ ही वादी क्र.१ ची आई असुन ते मयत सखाराम याचे वारस आहेत. वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबातील मुळपुरुष बबन हा असुन तो मयत आहे. बबन यास प्रतिवादी क्र.१ कलाबाई ही पत्नी आहे. मयत बबन व प्रतिवादी क्र.१ कलाबाई यांना मयत सखाराम व प्रतिवादी क्र.२ दत्तु हे दोन मुले व प्रतिवादी क्र.३ अनिता ही मुलगी असे अपत्ये आहेत. मयत सखाराम याने दोन विवाह केले असुन त्यापैकी वादी क्र.२ ही मयत सखाराम याची कायदेशीर पत्नी असुन वादी क्र.१ हा

कायदेशीर मुलगा आहे तर प्रतिवादी क्र.५ ही दुसरी व बेकायदेशीर पत्नी असुन प्रतिवादी क्र.४ हा प्रतिवादी क्र.५ हिस मयत सखाराम याचे पासुन जन्मास आलेला मुलगा आहे.

४. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकती असुन त्यांचे अद्यापपावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. वादींची दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींसह सामुहीक ताबेवहिवाट आहे. मुळपुरुष बबन याचे मृत्युपश्चात दावा मिळकतीस प्रतिवादी क्र.१ च्या नावाची नोंद झाली आहे. असे असले तरी दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा सामुहिक हक्क आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ ही दावा मिळकतीस तिच्या नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवुन दावा मिळकती विक्री करणार असल्याची माहिती वादींना मिळाली. करिता वादींनी प्रतिवादीस दिनांक १०/०६/२०१३ रोजी दावा मिळकतीचे वाटप होवुन त्यांचा हिस्सा स्वतंत्र करुन मागितला असता प्रतिवादी क्र.१ ने नकार दिला. करीता, वादींनी प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता दाखल केला असून प्रतिवादी क्र.१ विरुध्द प्रस्तुतचा तुर्तातुर्त मुनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला आहे.

५. वादींचे पुढे असे कथन आहे की, त्यांना प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजूने आहे. जर प्रतिवादी क्र.१ विरूध्द मनाई आदेश दिला नाही तर वादींचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल. करीता, वादींनी प्रतिवादी क्र. १ विरुध्द दाव्याचा अंतीम निकाल लागेपावेतो दावा मिळकतीचे विक्री, हस्तांतरण, तारण, गहाण, दान करु नये असा तात्पुरता मनाई आदेश मिळावा अशी विनंती केली.

६. प्रतिवादी क्र.१ ने निशाणी क्र. २१ वर कैफियत वजा म्हणणे दाखल करुन

वादींचे अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी क्र. १ ने वादीने दर्शविलेले दावा मिळकतीचे वर्णन व नातेसंबंध मान्य केले आहेत. परंतु, वादींची वाटपाची मागणी नाकारली आहे. प्रतिवादी क्र.१ ने तिच्या म्हणण्यात असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंब नसुन त्यांच्यात १५ वर्षोपूर्वी दावा मिळकतीचे तोंडी वाटप झाले असुन वाटपाप्रमाणे प्रत्येकजण आपआपल्या हिश्याची मिळकत वहिवाटीत आहे. त्यामुळे वादींना पुन्हा दावा मिळकतीचे वाटप मागता येणार नाही. परिणामी, वादींची वाटपाची मागणी मंजुर करता येणार नाही. प्रतिवादी क्र.१ ही तिच्या हिश्याची मिळकत वहिवाटुन तिचा चरितार्थ भागवित आहे. सदर मिळकतीशी वादींचा काहीही संबंध नाही. परिणामी, वादींचा अर्ज कायदेशीर चालु शकत नाही. शेवटी, प्रतिवादी क्र.१ ने वादीचा अर्ज फेटाळण्यास प्रार्थिले आहे.

७. वरीलप्रमाणे वादींचा अर्ज, प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रे पाहता. तसेच वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी सकृतदर्शनी केस त्यांचे बाजूने असल्याचे शाबीत करतात काय? | होय. |
| २ | तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल काय? | होय. |
| ३ | न्यायाचा तोल त्यांच्या बाजूने असल्याचे वादी शाबीत करतात काय? | होय. |
| ४ | काय आदेश? | अर्ज मंजुर. |

:: **<u>कारणमिमांसा</u>** ::

८. वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादींनी प्रस्तुत अर्जाचे पुष्टयर्थ अभिलेखावर दावा मिळकतीचा ७/१२ उतारा व गाव नमुना आठ अ चा उतारा दाखल केला आहे.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत</u>**–

९. मुद्दा क्र.१ ते ३ चे अनुषंगे प्रस्तुतचा ताकीदीचा अर्ज निकाली करते समयी वादींनी त्यांची प्रथमदर्शनी केस म्हणजेच दावा मिळकती ह्या वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबाच्या वडीलोपार्जित मिळकती असुन प्रतिवादी क्र. १ ही दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचा हक्कसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे या बाबी शाबीत करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी क्र.२ ने शपथेवर दावा मिळकती या तिच्या कुटुंबाच्या वडीलोपार्जित मिळकती असुन प्रतिवादी क्र.१ ही दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचा हक्कसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे असे कथन केले आहे. तर प्रतिवादी क्र.१ ने तिच्या म्हणण्यात दावा मिळकतीचे १५ वर्षापूर्वी तोंडी वाटप झाल्याचा बचाव घेतला आहे.

१०. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन आणि हिंदु कायद्यातील तरतुदीनुसार दावा मिळकतीचे तोंडी वाटप झाले हे शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र.१ वर आहे. अशा परिस्थितीत अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ ने तिच्या म्हणण्यात केवळ दावा मिळकतीचे १५ वर्षापूर्वी तोंडी वाटप झाल्याचे कथन केले

आहे. परंतु, सदरचे वाटप कधी, कसे व कोणामध्ये झाले आणि वाटपास कोण हजर होते, सदरच्या तोंडी वाटपात कोणास किती हिस्सा व कोणती जमीन देण्यात आली याबद्दल कोणतेही कथन केले नाही अथवा सदर वाटपाच्या अनुषंगे दावा मिळकतीच्या महसुल अभिलेखास नोंद झाली याबाबत कथन केले नाही आणि त्याअनुषंगे पुरावा देखील सादर केला नाही. विशेष म्हणजेच वादी अथवा वादीचे पूर्वहक्कदार सखाराम यास वाटपात कोणती जमीन दिली याचा देखील उल्लेख प्रतिवादी क्र.१ ने केलेला नाही. परिणामी, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.१ ने घेतलेला बचाव म्हणजेच दावा मिळकतीचे १५ वर्षापूर्वी तोंडी वाटप झाले ही बाब प्रथमदर्शनी शाबीत झालेली नाही.

११. मुद्दा क्र.१ ते ३ च्या अनुषंगाने अभिलेखावर उपलब्ध एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता वादींनी दावा मिळकती ह्या त्यांच्या एकत्र कुटुंबाच्या वडीलोपार्जित मिळकती असल्याचे कथन केले आहे. सदर कथनास हिंदु कायद्यातील तरतुदीनुसार एकत्र कुटुंबाच्या मिळकती ह्या वाटप शाबीत केल्याखेरीज एकत्रात असल्याचे गृहीतक आहे; तर प्रतिवादी क्र.१ ने तिच्या बचावामध्ये दावा मिळकतीचे पूर्वी वाटप झाल्याचे शाबीत केले नाही. परिणामी, सद्यस्थितीस दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाच्या वडीलोपार्जित मिळकती असुन त्यांचे अद्याप वाटप झाले नसल्याचे प्रथमदर्शनी शाबीत होते.

१२. वादी क्र.२ ने शपथेवर प्रतिवादी क्र. १ ही दावा मिळकतीत त्रयस्थ इसमांचा संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करित असल्याचे कथन केले आहे. तर प्रतिवादी क्र. १ ने

वादीचा दावा मिळकती मधील हक्क नाकारला आहे. अशा परिस्थितीत जर प्रतिवादी क्र.१ विरूध्द तात्पुरता मनाई आदेश दिला नाही तर प्रतिवादी क्र.१ ही दावा मिळकतीत त्रयस्थ इसमांचा हक्क निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीत त्रयस्थ इसमांचा हक्क निर्माण केल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होवून दाव्याची अनेकता होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सदरची बाब टाळण्या करिता प्रतिवादी क्र. १ विरूध्द मनाई आदेश पारीत करणे गरजेचे आहे. परिणामी, वादींनी त्यांना प्रथमदर्शनी केस असल्याचे व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. जर प्रतिवादी क्र.१ विरूध्द मनाई आदेश दिला नाही तर वादींचे दावा मिळकती मधील हक्कास गदा निर्माण होवून वादींचे नुकसान होणार आहे. याउलट, मनाई आदेश दिल्यास प्रतिवादी क्र.१ चे दावा मिळकती मधील हक्कावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. परिणामी प्रतिवादी क्र.१ चे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, मी मुद्दा क्र. १ ते ३ उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u> –**

१३. मुद्दा क्र. १ ते ३ बाबत वर नमूद चर्चेवरुन वादीने दावा मिळकती संदर्भात तुर्तातुर्त ताकिदीसाठी लागणाऱ्या बाबी म्हणजेच प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तोल व अर्ज नामंजुर केल्यास होणारे अपरिमित नुकसान या बाबी प्रथमदर्शनी त्यांचे बाजूने असल्याचे शाबीत केले आहे. परिणामी, वादींचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करिता, मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

–: **आदेश** :–

१. वादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो दावा मिळकतींचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, विक्री, गहाण, दान, तारण, कर्जबोजा निर्माण करुन त्रयस्थ इसमांचा हक्क निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश प्रतिवादी क्र.१ विरुध्द देण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालावर अवलंबून राहिल.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.04.16 17:22:17 +0530

**(अ.सं. जगताप)**

दिनांक १६/०४/२०२६

दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शिरूरकासार.

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 16/04/2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 16/04/2026 |

SAGAR SOPANRAO AJABE

Digitally signed by SAGAR SOPANRAO AJABE
Date: 2026.04.16 17:22:44 +0530

**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-3